# वाघ अभियांत्रिकीमध्ये उद्योगाभिमुख अभ्यासक्रम

## अतिरिक्त शुल्काविना विद्यार्थ्यांना लाभ

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत चार नवीन उद्योगाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांना शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय हे अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळणार आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांकडून हे अभ्यासक्रम तयार करण्यात आल्याचे संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी यावेळी सांगितले.

इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागांतर्गत इंडस्ट्रियल ऑटोमेशन,



रोबोटिक्स आणि मॅनेजमेंट विभागांतर्गत लीन मॅनेजमेंट, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागांतर्गत हीटिंग, व्हेंटिलेशन अँड एअर कंडिशनिंग आणि कॉम्प्युटर सायन्स विभागांतर्गत क्वांटम कम्प्युटिंग असे हे चार अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी हे अभ्यासक्रम तयार केले असून, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या पदावर काम करणारे संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम शिकविणार आहेत. तीन सत्रांचे (१८ महिने) हे अभ्यासक्रम असून, त्याचे १८ क्रेडिट्स विद्यार्थ्यांना मिळणार आहे. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. ज्या विभागांतर्गत कोर्स सुरू करण्यात आला आहे, त्या विभागातील विद्यार्थ्यांसह अन्य विभागातील विद्यार्थ्यांनाही यासाठी प्रवेश घेता येणार आहे. केवळ लेक्चर्स नव्हे, तर सेमिनार्स, प्रोजेक्ट्स, फिल्ड व्हिजिट, प्रशिक्षण, इंटर्नशिप अशा विविध माध्यमातून हे अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत. उद्योजक नीलेश साळगावकर, डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दिडमिशे या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. या तज्ज्ञांनी यावेळी संबंधित अभ्यासक्रमांच्या रचनेची माहिती दिली व उद्योगांच्या दृष्टीने असलेली गरज विषद केली. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते.

### उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ

यावेळी डॉ. नांदूरकर म्हणाले की, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. त्या-त्या क्षेत्रातील गरजा ओळखून अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसह अभियांत्रिकी पूर्ण केल्यानंतर बाहेर पडल्याया हे विद्यार्थी त्या-त्या क्षेत्रात काम करण्यास पूर्णपणे तयार असणार आहेत. उद्योग जगत आणि शिक्षण यामधील दरी भरून काढण्यासाठी हे अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे डॉ. नांदूरकर यांनी सांगितले.